**प्रेसनोट दि. ३/२/२०१८**

**सामाजिक सुरक्षा विभाग, गुन्हे शाखा पुणे शहर यांनी अल्पवयीन मुलांकडुन भिक मागुन घेणाऱ्या वडीला विरुध्द गुन्हा दाखल करुन ३ अल्पवयीन मुलांची सुटका केली.**

दिनांक ३/२/२०१८ रोजी पोलीस निरीक्षक श्री संजय पाटील सामाजिक सुरक्षा विभाग यांच्या आदेशाने सपोनि शीतल भालेकर, पो.हवा.तरटे, पोना.तेलंगे, पो.ना.शेलार, पोशि.गायकवाड मपोना. ठोंबरे, पो.ना.शिंदे यांनी सांगवी, वाकड, हिंजवडी भागात पेट्रॉलिंग करुन बारिक निरीक्षण करुन जगताप डेअरी रोड वरील व्दारकाधिश रेसिडेंन्सी शॉप नं.४ समोरील फुटपाथ शिवार चौक पिंपळे सौंदागर पुणे.येथे आरोपी नामे स्वराज देविलाल बागडीया वय ४९ वर्ष रा. लालटोपी नगर,मोरवाडी पिंपरी पुणे.मुळ रा. बिहारीपुरा पो.शहानगुडी राजस्थान याने एक अल्पवयीन मुलगी व दोन अल्पवयीन मुले यांचा उपयोग भिक मागण्याकरिता करुन घेत असताना मिळुन आल्याने सांगवी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.न.५४/२०१८ ज्युवेनाईल जस्टीस ॲक्ट कलम ७६ अन्वये गुन्हा दाखल करुन एक अल्पयीन मुलगी व दोन अल्पवयीन मुले यांना मा. बालकल्यान समिती पुणे.यांचे आदेशाने लहान मुलांचे काळजी व संरक्षण गृहात दाखल करण्यात आले आहे.

वरील नमुद कारवाई ही मा.श्री.प्रदिप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, मा.श्री.पंकज डहाणे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे पुणे, मा.श्री.संजय निकम, सपोआ, गुन्हे-२, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय पाटील, मसपोनि शीतल भालेकर, पोहवा.तरटे, पोना.तेलंगे, पो.ना.शेलार ,पोशि.गायकवाड, मपोना ठोंबरे, पो.ना.शिंदे त्यांनी केली आहे.